25 वर्षे विकासाची
मिरा भाईंदर महानगरपालिका
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**कार्यालय:**- तळ मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१
दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३, ई-मेल: publichealth@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./ ९४५ /२०२६-२७** **दिनांक:- ०४/०५/२०२६.**

**प्रती,**

**सिस्टीम मॅनेजर,**
**संगणक विभाग,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी विषयक नियमित कामे करणेकरीता बाहय सेवा पुरवाठादारकाची निवड करणेकामी जाहिर दरपत्रक सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेबाबत..**

**संदर्भ : मा. उपायुक्त (सार्व.आ.वि.) यांची दि. ०४/०५/२०२६ रोजीची मंजूरी**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका इंटीग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी विषयक नियमित कामे करणेकरीता बाहय सेवा पुरवाठादारकाची नियुक्ती करणेकामी शासन स्तरावरुन सुचना प्राप्त आहेत.

सबब, भविष्य निर्वाह निधी विषयक नियमित कामे करणेकरीता बाहय सेवा पुरवाठादारकाची नियुक्ती करणेकामी मा. उपायुक्त यांची दि. ०४/०५/२०२६ मंजूरी प्राप्त झाली असून त्याअन्वये सोबत जोडण्यात आलेली जाहिर दरपत्रक सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही विनंती.

(नंदकिशोर लहाने)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

25 वर्षे
विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**कार्यालय:**- तळ मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन, मांडली तलाव, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे-४०११०१
दुरध्वनी क्र. ०२२-२८१९९०९३, ई-मेल: moh@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## सार्वजनिक आरोग्य विभाग

**जा.क्र.मनपा/सार्व.आ.वि./७४४ /२०२६-२७** **दिनांक:- ०४/०५/२०२६.**

## // जाहिर दरपत्रक सूचना //

या नोटीसेव्दारे संबंधितांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका इंटीग्रेटेड हेल्थ ॲण्ड फॅमिली वेल्फेअर सोसायटी अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांचे भविष्य निर्वाह निधी विषयक नियमित कामे करणेकरीता बाहय सेवा पुरवाठादारकाची नियुक्ती करणेकामी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर तपशिल खालीलप्रमाणे -

| तपशील | एकुण भविष्य निर्वाह निधीकरीता पात्र कर्मचारी |
|---|---|
| भविष्य निर्वाह निधीविषयक नियमित कामे करण्याकरीता बाहय सेवा पुरवठादारकामार्फत प्रती महिना भविष्य निर्वाह निधी चलान तयार करणे तसेच नविन नियुक्त होणा-या कर्मचा-यांची नोंदणी करणे, कर्मचारी निहाय त्यांचे ईपीएफ संबंधित ज्या काही अडचणी आहेत त्या सर्व सोडविणे तसेच इ. ईपीएफची सर्व कामे करुन घेणे करीता ईच्छुक बाहय सेवा पुरवठाधारकांनी आपले दर सादर करावेत. | NUHM STAFF - 53<br>NTEP STAFF - 12<br>TOTAL STAFF - 65 |

इच्छूक संस्थांनी खालील अटी-शर्तीचे अधिन राहून दर सादर करावेत.

1. दर सर्व खर्चासह व सर्व करांसह (जीएसटी सह) सिलबंद दरपत्रके दि. 12/05/2026 रोजी सायं. 4.00 वाजेपर्यंत सार्वजनिक आरोग्य विभाग, तळ मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, मांडली तलावाजवळ, भाईंदर (प.) 401101 येथे जमा करावी.
2. दर आपल्या लेटर पॅडवर तपशिलवार व दरपत्रक धारकाचे नावाने सादर करावेत.
3. दरपत्रके सादर केल्यावर ते संपूर्ण माहिती घेवुन भरलेली आहेत असे समजण्यात येईल.
4. सशर्त असलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.
5. दरपत्रक धारकाचे दरपत्रके असलेल्याच नावाने बँकेचे खाते असणे आवश्यक आहे.
6. विहित अटी-शर्तीची पूर्तता न करणारी दरपत्रके नाकारण्यात येतील.
7. सदर दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचा / रद्द करण्याचा अधिकारी सार्वजनिक आरोग्य विभागास राहील.

Lahane

(डॉ. नंदकिशोर लहाने)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी,
मिरा भाईंदर महानगरपालिका